वाचा:- १. शासन पत्र वित्त विभाग क्रमांक सेवाप्र-२०११/ प्र.क्र.९९ / कोषा (प्र-३), दिनांक ०३ जून २०११.

क्र.स्था-१८ / ब / कलेप /विभाग बदली / स्थानिले / वलेप - ४/ 9098

संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य, कोकणभवन, ६ वा माळा,
नवी मुंबई ४०० ६१४
दिनांकः- 31 MAY 2013

**विषयः- लेखापरीक्षा लिपिक संवर्ग बदली व नियुक्ती.**

## आदेश

स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाच्या अधिपत्याखालील **लेखापरीक्षा लिपिक** संवर्गातील खालील कर्मचा-याची त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या रकाना क्रमांक ३ मधील ठिकाणी विनंतीवरून **विभागबाह्य बदलीने पदस्थापना** करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कर्मचा-याचे नांव, पदनाम, कार्यालयाचे नांव व ठिकाण | बदली करण्यात येत असलेले पद, कार्यालय व ठिकाण | रकाना क्रमांक ३ मधील पद रिक्त / उपलब्ध होण्याचे कारण |
|---|---|---|---|
| २ | ३ | ४ | |
| १ | श्रीमती. आ.म.काटोले, लेखापरीक्षा लिपिक, सहाय्यक संचालक , स्थानिक निधी लेखापरीक्षा, यवतमाळ (अमरावती विभाग) | लेखापरीक्षा लिपिक सहाय्यक संचालक , स्थानिक निधी लेखापरीक्षा, नागपूर. (नागपूर विभाग) | **पद रिक्त असल्यामुळे.** |

वरील कर्मचाऱ्याची बदली **महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५** मधील तरतुदीनुसार करण्यात आली आहे.

**सदर कर्मचाऱ्याची संवर्ग बाह्य बदली खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून करण्यात येत आहे.**

१) पूर्वीच्या विभागातील कनिष्ठ लेखापरीक्षक संवर्गातील सेवा, बदली झालेल्या विभागात त्या संवर्गातील ज्येष्ठतेसाठी गणली जाणार नाही. त्यामुळे बदली झालेल्या विभागात रुजू झाल्याचे तारखेपासून त्या विभागाच्या कनिष्ठ लेखापरीक्षक संवर्गाच्या ज्येष्ठता यादीत सर्वात कनिष्ठ म्हणून त्यांना ठरविले जाईल. म्हणजेच पूर्वीच्या सेवा ज्येष्ठता यादीवरील नाव काढून टाकण्यात येईल व पूर्वीच्या पदावर धारणाधिकार राहणार नाही.

२) कोणत्याही कारणास्तव कर्मचारी ज्या विभागातून बदलून आला आहे, त्या विभागात किंवा इतर विभागात बदली मिळणार नाही आणि तसेच पूर्वीच्या विभागातील ज्येष्ठतेशी तथा मूळ पदाशी संबंध राहणार नाही.

३) बदली झाल्यानंतर कर्मचारी विभागात रुजू झाल्याचे तारखेपासून, त्या विभागाच्या कनिष्ठ लेखापरीक्षक संवर्गात कनिष्ठतम गणला जाणार असल्यामुळे सर्वसाधारण कपातीच्या वेळी अगर त्या संवर्गातील पदे कमी झाल्यामुळे अगर कोणत्याही कारणास्तव त्या विभागात सदर कर्मचारी अतिरिक्त ठरला तर कोणतेही कारण न दर्शविता अगर पूर्व सूचना न देता सदर कर्मचाऱ्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

..२..

४) पूर्वीच्या सेवेचा लाभ, वेतननिश्चिती, रजा, निवृत्तीवेतन याकरिता वित्त विभागाच्या संबंधित नियमातील तरतुदींनुसार अनुज्ञेय होईल.

५) या बदलीच्या अनुषंगाने पदग्रहण अवधी, बदली अनुदान, प्रवासभत्ता वा तद्‌नुषंगिक लाभ अनुज्ञेय होणार नाहीत.

वरील कर्मचाऱ्याला बदलीच्या पदावर हजर होण्यासाठी त्यांच्या जागी तात्पुरती स्थानिक व्यवस्था करून त्वरीत कार्यमुक्त करावे. त्यांना या संचालनालयाच्या पूर्व परवानगीशिवाय रजा मंजूर करण्यात येऊ नये, किंवा त्यांचा मुदतवाढीचा प्रस्तावही सादर करण्यात येऊ नये. त्यांना कार्यमुक्त केल्याचा आणि त्यांनी बदलीच्या ठिकाणी पदग्रहण केल्याचा अहवाल संबंधित कार्यालय प्रमुखांनी या संचालनालयास तात्काळ पाठवावा.

(का.मा.विधाते)
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य.

प्रत :-

१. सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, अमरावती, नागपूर.
२. सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नागपूर, यवतमाळ.
३. संबंधित कर्मचारी.
४. संबंधित कर्मचा-याची वैयक्तीक नस्ती.
५. निवड नस्ती.